# श्रीमती श्रीखंडे बाईची कथा

'श्रीखंडेबाई आज सकाळी त्यांच्या बिछान्यावर मृतावस्थेत आढळल्या' असा फोन येताच कशालाही हात न लावण्याची सूचना देऊन इन्स्पेक्टर महेशांनी फोन बंद केला अन् मिळालेल्या पत्त्यावर ते सहकाऱ्यांना घेऊन ताबडतोब पोहोचले....

बाई अंथरुणावर झोपल्यासारख्या दिसत होत्या. झटापटीचं वा धडपडीचं काहीएक चिन्ह दिसत नव्हतं. चेहरा शांत होता !

खोलीतील सामान आपापल्या जागी व्यवस्थित होतं. तिच्या तपासणीत इन्स्पेक्टर महेशांना विशेष काही सापडलं नाही. बाईंची चालू वर्षाची डायरी नि झोपेच्या गोळ्यांची बाटली सोडून !

प्रेताचे फोटो घेणं संपल्यावर ते शवविच्छेदनासाठी पाठविण्यापूर्वी महेशांनी एकदा परत त्यांचं बारकाईनं निरीक्षण केलं.

बाई अंगानं थोराड, काळ्या वर्णाच्या, चौकोनी चेहऱ्याच्या अन् जरा पुरुषीच होत्या. कानशिलाची हाडं वर आलेली होती. जाड ओठावर समोरचे दोन दात आलेले होते. अन् बारकाईने पाहिले तर वरच्या ओठावर काळी लव स्पष्ट दिसून येत होती....

'कुरुप' या सदरातच बाईंची जमा होत होती.!

महेशांनी शव पोस्टमार्टेमसाठी पाठवलं अन् झोपेच्या गोळ्यांची बाटली, ठसेतज्ज्ञाकडे सोपवून ते एकेकाचा जबाब घेऊ लागले.

श्रीखंडेबाई अगदी एकट्या होत्या. लहानपणीच वडील वारल्यानं त्यांच्या आईनं त्यांचा सांभाळ केला होता. चार ठिकाणी स्वयंपाकपाणी करून तिनं बाईंना वाढवलं, शिकवलं होतं, शिक्षिका म्हणून शिवाजी विद्यालयात नोकरीला लावून दिलं होतं.

पण आयुष्यभर काबाडकष्ट केलेल्या या मातेला नंतर आलेले सुखाचे दिवस काही भोगता आले नाहीत. वर्षा दोन वर्षातच तिला जगाचा निरोप घ्यावा लागला आणि पोरीच्या दोन हाताचे चार हात करावयाची तिची इच्छा अपुरीच राहून गेली....

तेव्हापासून आजतागायत बाई तशाच राहिल्या होत्या, एकाकी, अविवाहित !

त्यांच्या विवाहाचा प्रश्न, त्यांच्या रूपामुळेही असेल कदाचित, पण



Scanned with OKEN Scanner

पुन्हा कधी उपस्थितच झाला नव्हता.

त्यांच घर अन् त्यांची शाळा हेच त्याचं मर्यादित विश्व होतं अन् त्यापलीकडे डोकावून पाहण्याची त्यांनी कधीच इच्छा अथवा धाडस केलं नव्हतं.

अलीकडे लता प्रधान नावाची कुणीएक मॅट्रिकची विद्यार्थीनी त्यांच्याकडे संध्याकाळी शिकण्यासाठी येत असे, तशीच ती कालही आली होती. त्यानंतर सकाळी मोलकरणीनं दार उघडेपर्यंत बाईंकडे कुणी आलेलं नव्हतं.

त्यांच्या खोलीतला दिवा मात्र रात्री बराच वेळ जळत होता, असं एका शेजाऱ्यानं सांगितलं.

बाईंचं शेवटचं दर्शन घेण्यासाठी खोलीत जमलेल्या त्यांच्या सहाकाऱ्यात अन् विद्यार्थी विद्यार्थीनीत महेशांनी लता प्रधानचा शोध घेतला, पण ती आली नसल्याचं त्यांना आढळलं. त्यांना तिची अशावेळची अनुपस्थिती खटकली. त्यांनी तिच्या घराचा पत्ता विचारून आपल्या डायरीत टिपून घेतला. तिची मुलाखत घेण्याचं मनात निश्चित केलं अन् ते आपल्या कचेरीत परतले.

पोस्टमार्टेमचा अहवाल येईपर्यंत बाईंच्या डायरीवरून केसवर काही प्रकाश पडतो की काय, याचा प्रयत्न करण्याचं त्यांनी ठरवलं. ते वाचू लागले.

डायरी चालू वर्षाची होती. सुरुवातीच्या पानांवरूनच त्यांच्या ध्यानात आलं की, या डायरी लेखनाला बाईंच्या एकाकी जीवनात असाधारण महत्त्व होतं. अत्यंत विश्वासातल्या सखीशी हितगुज केल्याचं समाधान त्यांना त्या लेखनानं मिळत असावं. विद्यार्थ्यांचा अभ्यास, पुरा करावयाचा अभ्यासक्रम, परीक्षा, पेपर तपासणी तसेच जीवनातले बारीकसारीक हर्षखेदाचे प्रसंग इत्यादी गोष्टींनी ती भरलेली होती.

त्यानंतर त्यांनी उन्हाळ्यात केलेल्या प्रवासाचं वर्णन तीत आलं होतं..

तपासाच्या दृष्टीनं महेशांना यात काही विशेष आढळत नव्हतं. बाई वाट्याला आलेल्या जीवनाच्या सरळ मार्गावरून संतोषानं वाटचाल करीत होत्या, एव्हढाच निष्कर्ष त्यातून निघत होता... कसलाही ध्यास, कसलीही वासना, कसलीही आत्यंतिक खंत किंवा खेद याचा पुसटसाही उल्लेख डायरीत कुठे नव्हता.

महेशाचं वाचन तरी चालूच होतं, अन् मध्येच त्यांचे डोळे चमकले. एका पानावर त्यांना प्रथमच लता प्रधानचा उल्लेख आढळला. त्यांची उत्सुकता



Scanned with OKEN Scanner

चाळवली.

बाईंनी लिहिलं होतं, 'आज मी एक अतिशय देखणी मुलगी पाहिली. अठरा एकोणीस वर्षाच्या त्या मुग्धेचं रूप इतकं विलोभनीय होतं की, माझ्यासारख्या स्त्रीला सुद्धा क्षणभर तिच्या चेहऱ्यावरून नजर काढून घेणं अशक्य झालं. मग वर्गातल्या इतर तरुण मुलांची काय स्थिति झाली असेल ?

ह्या वर्षी शाळा सुरू होऊन आज एक आठवडा झाला. मी रोलकॉल घेऊन नेहमीप्रमाणे आता आपल्या विषयास सुरुवात करणार इतक्यात चांदीच्या घंटीप्रमाणे मंजुळ स्वरात कुणीतरी विचारलं, 'मे आय कम् इन् मॅडम ?'

मी चमकून दाराकडे पाहिलं. एक मोहक तरूणी दारात उभी होती. मध्यम उंची, डौलदार बांधा, लिंबासारखी रसरशीत अंगकांती, लांबसडक कुरळ्या केसांच्या महिरपीनं वेढलेल्या प्राजक्तासारखा टवटवीत चेहरा, त्याच्याच देठासारखे लाल कोवळे ओठ, चाफेकळी नाक, शुभ्र दंतपंक्तीतून विलसणारं, गालाला खळी पाडणारं मोहक स्मित, बदामी डोळे.....

माझ्याप्रमाणे सारा वर्ग तिच्याकडे क्षणभर तटस्थ होऊन पहातच राहिला.

लगेच भानावर येऊन मी म्हणाले, 'येस ! कम इन् !'

ती आत आली अन् मुलींच्या बाकांकडे जाऊ लागली. तिचा पदन्यास मोराला नि हंसाला लाजविणारा होता !

तिचं नाव लता प्रधान आहे. तिनं या वर्षीच आमच्या शाळेत प्रवेश घेतला आहे. तिच्या वडिलांची आमच्या गावी बदली या उन्हाळ्यात झाली आणि आधीच्या गावी त्यांचे कुणी नातेवाईक नव्हते म्हणून किंवा इतर काही सोय न जमल्यानं तिला शाळा बदलावीच लागली. हे वर्ष मॅट्रिकचं असूनसुद्धा ! इत्यादी गोष्टी नंतर चौकशीत मला समजल्या.

पण नंतर मी जरी आपला विषय शिकविण्यास सुरुवात केली तरी मधून मधून माझी नजर हटकून लतेकडे वळायचीच अन् तिची माझी नजरानजर होताच एकप्रकारचा कंप मला सुटायचा, शरीर रोमांचित व्हायचं, तिच्या चेहऱ्यावरून नजर काढून घेणं अशक्य व्हायचं. ते स्वर्गीय रूप डोळ्यांनी पीतच राहावं असं वाटायचं.

'खरचं ! ईश्वर एक महान कलावंत आहे.'

त्या दिवशीचं लेखन इथं थांबलं होतं. महेश डोळे मिटून खुर्चीवर थोडे मागे रेलले. त्यांची मुद्रा विचारमग्न झाली. एका विचित्र वाटणाऱ्या शंकेनं



Scanned with OKEN Scanner

त्यांच्या मनात हळूच प्रवेश केला होता. त्यांनी तिच्यावर बराच वेळ विचार केला, पण बाईंच्या मृत्यूचे गुढ उकलण्यासाठी कसलाही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी त्यांनी डायरीचे संपूर्ण वाचन करायचं ठरवलं....

आणि त्यांच्या लक्षात येऊ लागलं की, दिवसेंदिवस बाईंच्या मनात लतेबद्दल ओढ उत्पन्न होऊ लागली असते. तिचं बोलणं, हसणं, लाडके-लाजरे विभ्रम इत्यादिकांनी त्यांना मोहून टाकलं होतं. वर्गातील तरुणांचा ती एक हृद्रोगच होऊन बसली असते यात नवल नसतं. पण इतर मुलींनादेखील तिच्या सौंदर्याचा मत्सर वाटू लागतो.

लतेला मात्र आपल्या रूपाचा मुळीच गर्व नसतो. त्यामुळेच अतिशय गोड, आर्जवी नि लाघवी स्वभावाची लता तशी सर्वांनाच आवडते. ती एखाद्या दिवशी वर्गात नसली तर आपलं लक्ष शिकवण्यात लागत नाही, असं बाईंना आढळून येतं. त्यांना वर्ग नीरस वाटतो.

उलट ती वर्गात असली तर त्यांना शिकवण्याला जोर चढतो. उत्साह वाटतो. त्या आपला विषय अधिकच रंगवून सोडतात. लतेच्या डोळ्यात प्रकटलेली बाईंबद्दली गाढ आदराची भावना त्यांच्या मनात एक अनामिक गोड हुरहुर उत्पन्न करते. त्या उत्तेजित होतात. सुखावतात.....

तिमाही परीक्षेच्या दहाबारा दिवसात बाईंनी डायरीत जवळजवळ काहीच लिहिलं नसतं. आतापर्यंतच्या त्यांच्या डायरी लेखनात जसे इतर विषयही आलेले होते तसेच काही त्रोटक, जुजबी विषयांनी ती भरलेली होती.

एके दिवशी मात्र आरशासमोर प्रसाधन करीत असताना त्यांना आपल्या ओठावरची काळसर लव अधिकच ठळक झाली असल्याची जाणीव होते. त्या अस्वस्थ होतात. आजपर्यंत आपलं इकडे कसं लक्ष गेलं नाही याचं त्यांना कोडं पडतं. आपल्या तथाकथित रूपाची जाणीव असूनही त्यांना हे वैगुण्य, हा बदल पचवता येत नाही. त्यांच्या मनाची दिवसभर घालमेल होते, अन् रात्री ती डायरीत जशीच्या तशी उतरते.... पण पुढे परीक्षेच्या धांदलीत बाईंची ही बोच पार पुसली जाते.....

तिमाही परीक्षेच्या निकालाची प्रगती पुस्तकं वर्गात मुलांच्या हाती देत असताना लतेचं प्रगतीपुस्तक पाहून बाई लतेवर खूप रागावतात.

बाईंचा अभिमान दुखावला गेला असतो. इंग्लिश सोडून इतर साऱ्या विषयात लतेला प्रथम वर्गाचे गुण असतात, इंग्लिशमध्ये मात्र तिला जेमतेम

उत्तीर्ण होण्यापुरते गुण असतात, अन् हा त्यांचा विषय असतो !

आतापर्यंत त्यांच्या या विषयात इतके कमी गुण कुणीच मिळवले नसतात. वर्गातील इतर विद्यार्थ्यांचे गुण या विषयात तिच्यापेक्षा कितीतरी अधिक असतात, कारण हायस्कूलमध्ये प्रवेश केल्यापासूनच ती बाईंच्या हाताखाली असतात आणि त्यांच्या हाताखाली शिकलेली मुलं इंग्लिशमध्ये उत्तम गुण मिळवतातच असा त्यांचा आजवरचा लौकिक होता.

आणि आज त्यांच्या लौकिकाला तडा गेला होता, लतेमुळं ! त्यांच्या आवडत्या विद्यार्थीनीमुळं !

त्यांचा राग अनावर होतो. त्या लतेला भर वर्गात खूप टाकून बोलतात, तिच्या रूपाचा या संबंधात उल्लेख करून तिचा अपमान करतात.

लता मुळूमुळू रडू लागते. तिला मेल्याहून मेलं होतं. वर्गात विचित्र तंग वातावरण उत्पन्न होतं. बाई वर्ग सोडून निघून जातात.

आपल्याकडून लतेच्या भावना दुखावल्या गेल्या याची बाईंना फार खंत वाटू लागते. त्यांच्या नंतर लक्षात येतं की याच वर्षी लता आपल्या शाळेत आलेली असते. अन् आधीच्या शाळेत तिचा हा विषय कच्चा राहून गेला असण्याची शक्यता त्यांच्या मनाला पटते. त्याबरोबर आपल्याकडून लतेवर अन्याय झाला अशी त्यांना खंत लागून राहते, बोच लागते.....

अन् तरीहि त्यांच्या मनाच्या एका कोपऱ्यात खोल कुठंतरी सूक्ष्म आनंद होत असतो, ऐन शृंगाराच्या भरात प्रेयसीला दंश करताना होतो तसा !

दुसऱ्या दिवशी रविवार असल्यानं बाई सकाळी घरीच असतात. सकाळचा चहा नुकताच झालेला असतो. अन् त्या वर्तमानपत्रावर नजर फिरवीत बैठकीत कोचावर बसलेल्या असतात. सुटी असल्यानं स्वयंपाकाची घाई नसते म्हणून.....

आणि अशावेळी लता येते. नजर खाली, अंगाला भीतीनं कंप सुटलेला अशी, दारातच थबकून उभी राहते.

बाईचं तिच्याकडे बराच वेळ लक्ष जात नाही. तितका वेळ ती तशी उभी राहते. त्यांचं तिच्याकडे जेव्हा लक्ष जातं तेव्हा त्या तिला प्रेमळ स्वरात आत बोलावतात. ती घाबरतच आत येते. बाई तिला आपल्याजवळ बसण्याची खूण करतात.

बाईकडे सशासारखी नजर टाकून ती कोचाच्या अगदी कडेला टेकते.



Scanned with OKEN Scanner

तिला तशी अवघडून बसलेली नि लाजेने अर्धमेली अशी पाहून बाईंना तिचा एकदम कळवळा येतो. त्यांना काल आपण तिच्यावर केलेल्या अन्यायाची परत जाणीव होते. त्या तिच्याजवळ सरकतात. पाठीवर मायेनं थोपटल्यासारखं करीत प्रेमानं बोलू लागतात.....

अन् त्या मायेच्या स्पर्शानं नि बोलांनी लतेच्या मनाचा बांध फुटतो. तिला गदगदून येतं. ती रडू लागते, अगदी हमसाहमशी !

काही वेळानं तिचा आवेग ओसरतो. ती शांत होते. बाईंशी मोकळं बोलू लागते. सारं सारं सांगून टाकते.

ती आईवेगळी असते. एकुलती एक नि घरची गरिबी असते. आईवेगळी पोर म्हणून वडिलांची तिच्यावर फार माया असते. तिला कुणाचंच बोलणं म्हणून ठाऊक नसतं.

कालचा प्रकार घरी लतेकडून कळल्यावर तिला तिच्या वडिलांनी लगेच आज सकाळी बाईंकडे पाठवलं असतं. शिकवणी लावून घेण्यासाठी, त्यांची ऐपत नसतानाही !

ते स्वत:ही त्यासाठी संध्याकाळी बाईंना भेटणार होतेच.

बाईंना वाईट वाटतं. लतेला आणखी जवळ ओढून तिच्या पाठीवरून हातानं गोंजारत बाई तिला समजावतात. तिची शिकवणी फुकट करण्याचं आश्वासन देतात. आत्यंतिक दारिद्र्याची झळ त्यांनीहि लहानपणी सोसली असल्यानं त्यांना तिची व्यथा कळू शकते.

लतेचा चेहरा कृतज्ञतेनं ओतप्रोत भरून जातो. ते पाहून बाईंना आत अत्यंत सुख होतं. खोल कुठेतरी एक गोड, अनामिक भावना उत्पन्न होते. शरीर उत्तेजित झाल्यासारखं वाटतं. त्या लतेला अधिकच आवळल्यासारखं करतात...

त्या रात्री डायरी लिहिताना शेवटी त्यांनी ह्या भावनेबद्दल अशी नोंद केलेली असते की, कदाचित आईवेगळी पोर म्हणून आपल्याला तिच्याबद्दल करूणा वाटत असावी, वात्सल्य वाटत असावे !

लता रोज शिकवणीसाठी घरी येऊ लागते. साधारणत: सायंकाळी सात ते नऊ शिकवणी चालते. हळूहळू इंग्रजीबरोबर त्या इतर विषयही थोडे थोडे घेऊ लागतात. नेहमीप्रमाणे शिकवण्यात रमून जातात.

लतेचाही संकोच हळूहळू दूर होऊ लागतो. ती बाईंशी मोकळं बोलू लागते, फावल्या वेळात इतर अवांतर गोष्टी बोलू लागते. बाईंच्या मायेनं तिच्या

आयुष्यातील एक उणीव दूर झाल्यासारखं तिला वाटतं. त्यांच्या ठिकाणी तिच्या मनात विश्वास, श्रद्धा उत्पन्न होते. गुरुशिष्याचं नातं मागे पडतं. अन् लता बाईंना आपल्या मोठ्या बहिणीसारखी मानू लागते. अन् तसं ती बाईंजवळ बोलूनही टाकते. आपल्या वडिलांच्या संमतीनं ठरलेल्या प्रेमविवाहाची गुप्त गोष्टही बाईंजवळ बोलून जाते. आपल्या भावी पतिच्या वर्णनासहित !

तिचा भडभडा, मोकळा स्वभाव ह्याला कारण असतो.

शिकवणीच्या निमित्तानं बाईंना लतेचा जसजसा अधिक सहवास घडू लागतो तसतसं त्यांचं तिच्याबद्दलचं आकर्षण वाढू लागतं. तिचा मोहक चेहरा पाहताना, मधूर स्वर ऐकताना, ती लाडानं अंगचटीस गेली असताना त्यांना एक विचित्र ओढ आत खोल कुठंतरी उत्पन्न होत आहे असं वाटायचं अन् पाण्यात दगड टाकल्यावर उत्पन्न होऊन गोल गोल पसरणाऱ्या लाटांप्रमाणे ती भावना त्यांच्या शरीराला आतून धडका देऊ लागायची. त्यांचं शरीर कापू लागायचं.

आपल्या मनाच्या ह्या अवस्थेचा शोध घेण्याचा त्यांनी कसोशीनं प्रयत्न करून पाहिला होता, पण ह्यात त्यांच्या पदरात अपयश पडलं होतं. नंतर त्यांनी तो प्रयत्नच सोडून दिला होता.

सहामाही परीक्षेचा निकाल लागतो अन् त्यात लतेला इंग्लिशमध्ये सर्वात अधिक गुण मिळतात. बाईंना खूप आनंद होतो. प्रगतिपुस्तकं वाटतांना बाई या गोष्टीचा आवर्जून उल्लेख करतात, लतेचं अभिनंदन करतात. मागील प्रसंगाची आठवण येऊन लतेच्या डोळ्यात पाणी तरळतं. सारा वर्ग हर्षानं चीअरिंग करतो.

त्या दिवशी संध्याकाळी लता नेहमीप्रमाणे शिकवणीच्या वेळी बाईंकडे येते अन् कृतज्ञतेने त्यांच्या पाया पडते. आपल्यावर झालेल्या त्यांच्या उपकारांच्या ओझ्याखाली ती अवघडून गेलेली असते. ती मूक होते.

बाईंना तिची ही अवस्था कळते, म्हणून तिला मोकळं करण्यासाठी त्या मुद्दाम स्वतःच बोलू लागतात. तिलाच यशाचं सारं श्रेय देतात. अधिक मोकळं वातावरण उत्पन्न व्हावं म्हणून इतर विषय संभाषणात काढून थट्टा विनोद करतात. तिला खुलवण्यासाठी तिच्या प्रियकरावरून तिला चिडवतात. गोड थट्टा करून तिच्या मनाला गुदगुल्या करतात.

लता लाजेनं लालीलाल होते. खाली मान घालून तिरक्या नजरेनं बाईंकडे पाहते अन् खुदकन हसते. तिच्या गालांना मोहक खळी पडते.



Scanned with OKEN Scanner

अन् ती लोभस खळी पाहताच बाईंचं भान हरपतं. त्यांच्या मनावरचा ताबा सुटतो. आत ती अनामिक लाट उत्पन्न होते. शरीराच्या आतील किनाऱ्यावर धडका देऊ लागते. रक्त तापल्यासारखं होतं, हात शिवशिवू लागतात. अन् झपाटल्यासारखं होऊन बाई लतेला आपल्या कणखर मिठीत झटकन घेतात. तिच्या मोहक चेहऱ्याची चुंबनावर चुंबनं घेऊ लागतात.... तिला गुदमरवून सोडतात.... स्थळकाळाचं त्यांना भान उरत नाही....

या अचानक हल्ल्यानं लता क्षणभर हतबुद्धच होते. काय घडतं आहे हेच तिला उमगत नाही, पण नंतर ती लगेच भानावर येते. स्वत:ला बाईंच्या बाहुपाशातून कसंबसं सोडवून घेते. बाईंकडे विचित्र नजरेनं बघत बाहेर सटकते. तिच्या मनाचा गोंधळ उडालेला असतो. तिला एकंदर प्रकाराचा अर्थ कळत नाही.

बाई कोचावर अस्ताव्यस्त कोसळतात अन् आपलं तोंड दोन्ही हातात लपवून घेतात.

त्या रात्री बाईंच्या डोळ्याला डोळा लागत नाही. शरमेनं त्या मेल्याहून मेल्यासारख्या होतात. हजारो विचारांच्या इंगळ्या त्यांना दंश करीत राहतात. स्वत:त उत्पन्न झालेल्या ह्या विकृतीनं, त्या हताश होऊन जातात. खंत करीत राहतात..... पूर्वीप्रमाणे त्या स्वत:ला फसवू शकत नाहीत !

अन् म्हणून त्या या विकृतीला समूळ उपटून टाकण्याचा निर्धार करतात. लतेची शिकवणी बंद करण्याचं पक्कं ठरवतात, काहीतरी कारण काढून ! स्वत:कडे वाईटपणा घेऊनसुद्धा !......

आणि इकडे लताच त्यांच्याकडे दोन तीन दिवसांच्या अंतरानं येते. डोळ्यात पाणी आणून त्यांची क्षमा मागते. त्यांनी मायेनं, वात्सल्यानं केलेल्या वर्षावाचा आपण विपरीत अर्थ घेतला अशी तिला मधले काही दिवस खंत लागून राहिलेली असते. ती सरळ, निष्कपट मुलगी, मोठ्या बहिणीसारख्या असणाऱ्या बाईंचा आपण तुटक वागून अपमान केला, त्यांच्या भावना दुखावल्या असं समजते.....

आणि घसरलेला तोल सावरण्याचा बाईंचा निश्चय लतेच्या आसवात वाहून जातो. लतेची शिकवणी पूर्ववत सुरू होते. लतेला हळूहळू या प्रकरणाचं विस्मरण पडू लागतं.....

पण बाई आता सावध असतात. केवळ शिकवण्याचं कर्तव्य



Scanned with OKEN Scanner

करण्यापलीकडे इतर गोष्टीत त्या लक्ष घालत नाहीत. तिच्या कसल्याही अविर्भावांनी स्वत:ला उत्तेजित होऊ देत नाहीत. दिवसाचा सारा वेळ शाळा नि इतर छंदात बांधून टाकतात. त्या धार्मिक, शास्त्रीय विषयाच्या वाचनात मन गुंतवतात. देवघरातील मूर्तिसमोर त्या तासन् तास बसून राहू लागतात, एकाग्र मनानं पूजाअर्चा करतात. ओढाळ मनास बांधून टाकण्याचा त्यांचा हटयोग सुरू होतो.

अन् इकडे त्यांच्या या तुटक वागण्याचा निराळाच अर्थ घेऊन त्यांना खुलवण्यासाठी, त्यांचा राग दूर करण्यासाठी लता अधिकच मोकळेपणाने त्यांच्याशी वागू लागते. तिचे लाडिक अविर्भाव अधिकच गहिरे होतात. लाडावलेल्या मांजरीसारखी ती वारंवार त्यांच्या अंगचटीस जाऊ लागते. मानलेल्या मोठ्या बहिणीचा रूसवा काढण्यासाठी कसोशीनं प्रयत्न करते... सरळ भावानं!

आणि हेच बाई आवरू शकत नाहीत, त्यामुळे दिवसभर निरनिराळ्या उद्योगात बुडवून टाकलेलं मन रात्री मोकळं होताच बंड करून उठतं. बिछान्यावर तळमळत त्या रात्री काढू लागतात. पाण्याबाहेर काढलेल्या मासोळीसारखा त्यांचा तडफडाट होऊ लागतो. लतेची चेटुक करणारी मूर्ति त्यांच्या मन:चक्षुसमोरून हटत नाही. त्यांच्या देहाची आग होऊ लागते. डोकं फुटून निघायची वेळ येते. झोप येण्यासाठी त्या झोपेच्या गोळ्या घेणं सुरू करतात.

कधी कधी त्यांच्या मनात, आपली प्रकृति एखाद्या मानसोपचारतज्ज्ञांना दाखवावी असं येतं पण स्त्रीसुलभ लज्जेनं त्यांच्या हातून ही गोष्ट कधीच होत नाही.

परिणामत: झोपेच्या गोळ्यांचाही त्यांना उपयोग होत नाही. त्यांची मन:स्थिती भ्रमिष्टासारखी होते. लतेची मूर्ती, तिचा विचार, आता केव्हाही थोडी उसंत मिळताच उसळी मारून वर येतो. त्यासरशी शरीराच्या आतून खोल कुठेतरी ती जबरदस्त लाट जागी होते. शरीरभर पसरून साऱ्या गात्रांना धडका देऊ लागते. त्यांचं शरीर अगदी खिळखिळं करून सोडते. तिला आवरता आवरता त्या अगदी हीनदीन होऊन जातात, केविलवाण्या होतात. एखाद्या फिटमधून जागं व्हावं तशा निष्प्राण, फिकट, पिळून काढल्यासारख्या दिसतात. त्यांच्या डोळ्यातून झरझर अश्रू वाहू लागतात.....

बाई एखाद्या आजाऱ्यासारख्या दिसू लागतात. लतेला याची प्रथम जाणीव होते. ती त्यांच्याशी अधिकच सहानुभूतीनं वागू लागते. अतिशय प्रेमळ



Scanned with OKEN Scanner

बनते.

अन् आगीत तेल ओतलं जातं !

म्हणूनच शाळेचं गॅदरिंग पंधरा दिवसांवर येतं तसं बाईंना सुटल्यासारखं वाटतं. कारण गॅदरिंगच्या नाटकात लता काम करणार असते अन् तिच्या तालमीची वेळ संध्याकाळचीच असते, म्हणून ती शिकवणीस येऊ शकणार नसते. आणि त्यामुळे तिचा उत्तेजक सहवास नि नंतर होणारी त्यांच्या मनाची ती केविलवाणी अवस्था ह्या सर्व गोष्टींना आता पायबंदच बसणार असतो..... काही दिवसांसाठी तरी !

निदान बाईंना तरी तसं वाटतं !

पण हे समाधान तकलादू असतं हे त्यांना लवकरच कळून येतं. त्या लाटेला जन्म घेण्यास लतेची नुसती आठवण, वर्गातील साधे दर्शन, साधी हाकही पुरेशी होते असं त्यांना लवकरच दिसून येतं.

उलट, शिकवणीच्या वेळात मिळणाऱ्या तिच्या उत्तेजक सहवासानं, मधुर लाडिक बोलांनी नि मखमली स्पर्शानं त्यांच्या तगमगणाऱ्या मनाला थोडा वेळ तरी शीतल लेप लावला जात असतो.

अन् आता तेही बंद झालं असतं !

परिणामत: बाई एकसारख्या त्या झपाटलेल्या अवस्थेत गुंगलेल्या राहू लागतात. त्यांची झोप पार नाहीशी होते. त्या खंगु लागतात. सुटी घेऊन घरी बसतात.

अन् रिकाम्या वेळात ते भूत त्यांच्या मानगुटीस अधिकच बसते.

अशातच नाटकाची रात्र उजाडते. लतेच्या आग्रहाला बळी पडून बाई नाटकाला येतात. हा निर्णय घेताना त्यांच्या मनाची फार घालमेल होते, पण पाय शाळेकडे वळतातच !

नाटक सुरू होण्यास थोडा अवधी असतो. तेवढ्या वेळात त्या ग्रीनरूममध्ये जातात. लताला शुभेच्छा देण्यासाठी !

त्या मेकपरूमचं दार उघडतात. खोलीत लतेशिवाय कुणीच नसतं. बाकी सर्व नट खाली विंगमध्ये असतात, आपापला मूड घेऊन....

बाईंना पाहून लता लगबगीनं समोर येते. त्यांच्या पाया पडते. त्या तिच्या डोक्यावर हात ठेवतात अन् भिल्लीणीच्या अपुऱ्या वेशातील लतेला उठवतात, निरखून पाहतात....



Scanned with OKEN Scanner

मेकपमध्ये लता अधिकच सुंदर दिसत असते. तिचे काजळ घातलेले डोळे अधिकच अल्लड, अधिकच नाचरे, हसरे दिसतात. चेहरा मादक दिसतो. लाल ओठांची महिरप वेड लावणारी असते. तिच्या अपुऱ्या वस्त्रातून उतू जाणारं लावण्य चेटुक करणारं होतं....

तिच्यावर गुंतून पडलेली नजर ओढून काढत बाई तडक खोलीबाहेर पडतात. काळजाचा लचका तोडून काढावा तसं स्वतःला खोलीबाहेर ओढून काढतात. हॉलमध्ये येऊन खुर्चीवर बसतात, पडद्याकडे पहात राहतात. डोळ्यासमोर लतेचंच रूप नाचत राहतं....

पडदा उघडतो. शंकराच्या ध्यानस्थ मूर्तिसमोर भिल्लीणीच्या वेशातील पार्वती नृत्य करीत असते. रागावून निघून आलेल्या शंकरांना मोहात पाडणारं, तप मोडणारं ते उन्मादक नृत्य असतं. त्यानं बाई अस्वस्थ होऊ लागतात. लतेचा नृत्यातील तो प्रणयी अभिनय पाहणं त्यांना अशक्य होतं, असह्य होतं, आत खोलवर ती चिरपरिचित लाट डोकं वर काढू लागते.

त्या सावध होतात. जोराचा झटका येण्यापूर्वीच ताडकन उठून हॉलबाहेर पडतात. घरी येतात. कॉटवर अंग झोकून ढसढसा रडू लागतात. नियंत्रणाबाहेर गेलेल्या त्यांच्या शरीरानं त्यांना जीवनातून उठवलं ही जाणीव त्यांना शोकाकुल करून सोडते. त्या देवाच्या मूर्तिसमोर येऊन बसतात. त्याच्याशी मनात बोलू लागतात, बोल लावतात, मृत्यूची भीक मागतात.

ती मूर्ती मंद स्मित करीत त्यांच्याकडे पाहात असतो ! देव दगड आहे हे त्यांना पटतं !

त्या पुन्हा कॉटवर येतात.

भिल्लीणीच्या अपुऱ्या वेषातील लता आपल्या लाडिक, मादक अविर्भावानं त्यांना चेटुक करीतच असते. त्यांचं शरीर त्या दाहक विकृत वासनेनं जळतच असते. लाट शरीरभर पसरून तिनं आतून शरीराचा ताबा घेतलेलाच असतो.....

आणि वेळेचं भान निघून गेलेलं असतं !

दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत बाई ह्याच अवस्थेत कॉटवर तळमळत पडलेल्या असतात. उपाशी, निद्राहीन, हिस्टेरीयाच्या झटक्यात असल्यासारख्या...

संध्याकाळी लता नेहमीप्रमाणे शिकवणीच्या वेळी येते. बाईंकडून आपलं कौतुक करून घ्यायला ! नाटकातल्या स्वतःच्या भूमिकेबद्दल बोलायला!



Scanned with OKEN Scanner

ती दार उघडून आत येते. खोलीत अंधार पाहून, प्रथम बटन दाबून उजेड करते. बाईंना कॉटवर पाहून तिला शंका येते. ती जवळ जाऊन त्यांच्या कपाळावर आपल्या हाताचा तळवा टेकते. तिच्या हाताला चटका बसतो. स्नेहानं भरलेल्या आवाजात ती बाईंना साद घालते...

बाईंचे लाल शिरा उठलेले डोळे उघडतात !

समोर लता उभी असते. प्रथम अंधुक, नंतर स्पष्ट, भिल्लीणीच्या अपुऱ्या वेशात ! त्याच मादक, चेटुक करणाऱ्या अविर्भावात ! त्यांच्याकडे डोळे मोडत, गालाला खळी पाडून हसत.

आधीच खवळलेल्या देहावर एक मोठा पाणलोट येतो. त्याच्या तडाख्यात सापडून बाई ताडकन उठतात, अन् लतेला उराशी घट्ट घट्ट आवळून तिच्या सुकुमार चेहऱ्याची, गालाची, केसांची, ओठांची, गोऱ्या नितळ गळ्याची पटापट चुंबनं घेऊ लागतात. तिच्या सर्वांगावरून आपला थरथरता हात फिरवू लागतात. त्यांच्या शरीराला, मनाला एक आसुरी आनंद होऊ लागतो. त्यांचा आवेग वाढतच जातो. अन् त्या उर्मीतच तिला एका हातानं घट्ट धरून दुसरा हात तिच्या पोलक्यात खसकन घुसवतात....

अन् आतापर्यंत गोंधळलेल्या अवस्थेत असलेल्या लतेला एकदम जाण येते. साऱ्या प्रकाराचा अर्थ तिच्या मनात लखकन् चमकून जातो. मागची आठवण एकदम मनात उसळी मारते. बाईंच्या वागण्याचा हा अत्यंत हिडीस, किळसवाणा अर्थ एकदम तिच्या मनात उघडा पडतो. तिचा सारा आदर, सारी माया तापल्या तव्यावर पडलेल्या पाण्याच्या थेंबासारखी क्षणात आटून जाते.

आणि त्यांच्या पुढे आलेल्या, वासनेनं विद्रुप झालेल्या चेहऱ्यावर ताड्ताड् प्रहार करून ती बाईंना शुद्धीवर आणते. स्वत:ला त्यांच्या मगरमिठीतून सोडवते. त्यांच्याकडे तिरस्काराची, क्रोधपूर्ण नजर टाकून काहीएक न बोलता खोलीबाहेर पडते. शिसारी येऊन ! अपमानित !!

बाई आत्यंतिक शरमेनं कोळसा होऊन उभ्या असतात.

त्या रात्री बाईंच्या खोलीत बराच वेळ दिवा जळत राहतो....

डायरीचा शेवट करताना बाईंनी आपली सारी व्यथा, सारा मनस्ताप उतरवून ठेवला असतो. लतेच्या प्रहारांनी त्यांना जाग आणली असते. त्यांच्या भावविश्वात भयंकर तुफान उठवलं असतं.

पण शेवटी शेवटी त्या शांत होऊ लागल्या असतात. विवेकाची ज्योत



Scanned with OKEN Scanner

स्थिर होऊ लागलेली असते. त्या प्रकाशात पुढे चालायचा मार्ग त्यांना स्वच्छ दिसू लागला असतो आणि त्यावरून परत मागे फिरण्याचा आता प्रश्न उरला नसतो.

नियंत्रणाबाहेर गेलेल्या विकृत देहाचा आता लोभ धरण्यात अर्थ उरलेला नसतो... त्याला सुधारण्यासाठी शेवटपर्यंत संधी देण्यात आलेली असते तरी जे त्याच्याकडून घडू नये असं मनोमन इच्छिलं होतं ते घडलं होतं. आता त्याचा भरवसा राहिला नव्हता... त्यानं बाईंना काळिमा लावला होता....

अन् म्हणून बाईंनी झोपेच्या गोळ्यांची बाटली पोटात पूर्ण रिकामी केली होती....!

इन्स्पेक्टर महेशांनी डायरी मिटून खाली ठेवली. सुन्न मनानं ते खिडकीशी उभे राहिले -

अखेर विकृतीनं पराजित बाईंचा बळी घेतला होता !!

Scanned with OKEN Scanner